शोधपत्र

March, 2010

# ई-गव्हर्नन्स व प्रशासकिय सुधारणा संदर्भ महाराष्ट्र राज्य

* श्री स्वप्निल हनुमंतराव पेंडलवार
** प्रा. प्रविण के. पवार

*अधिव्याख्याता, लोकप्रशासन विभाग, पीपल्स कॉलेज, जि. नांदेड, महाराष्ट्र
** समाजशास्त्र विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड

ई–गव्हर्नन्स हि संकल्पना एकविसाव्या शतकात कांतीकारी संकल्पना म्हणून उदयास येत आहे. या संकल्पनेचा प्रभाव हा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व प्रशासकिय अशा अनेक क्षेत्रावर पडलेला दिसून येतो. संगणक, इंटरनेट, भ्रमणध्वनी, पेजर, फॅक्स, रेडिओ पेजींग इत्यादी ई–गव्हर्नन्सचेच घटक मानले जातात. ई–गव्हर्नन्स हे एक विशेषण आहे. जेंव्हा एखादे प्रशासन आपल्या जनतेला सेवा पुरवितांना माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग करते, ईलेक्ट्रॉनिक्स साधनाचा वापर करुन सामान्य जनतेशी तात्काळ संपर्क प्रस्थापित करते, त्यांना तात्काळ दर्जेदार व माफक दरात सेवा पुरविते त्याच प्रमाणे तंत्रज्ञानाच्या आधारे कार्यक्षमता, पारदर्षिपणा, समन्वय, कार्यपध्दतीत आधुनिकता इत्यादी बदल घडवून आणते अशा प्रशासनास ई–गव्हर्नन्स हे विशेषण लागू पडते. प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र राज्याची निवड केली आहे. कारण हे राज्य देशातील एक पुरोगामी विचारांचे आणि विविध क्षेत्रात आघाडीवर असलेले राज्य समजले जाते. नवे विचार, नवे तंत्रज्ञान, नवनवीन पध्दती महाराष्ट्राने आत्मसात करण्यात नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. शासकीय पातळीवर देखील किती तरी योजना, उपक्रम हे आधी महाराष्ट्रात सुरु झाले आणि त्यांची उपयुक्तता, व्यवहार्यता पाहून ते पुढे अन्य राज्यांमध्ये व प्रसंगी राष्ट्रीय स्तरावर देखील राबविले गेले आहेत.

ई–गव्हर्नन्स अंतर्गत सध्या राज्यातील 25 जिल्हयांच्या आणि 273 तालुक्यांच्या ठिकाणी नागरीक सुविधा कंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. या केंद्रामधून जनतेला नेहमी लागणारी 73 प्रकारची प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतात. आता मंत्रालयापासून तालुका पातळीपर्यंत सर्व सरकारी कार्यालये इंटरनेटने जोडण्यात आली आहेत. हायस्पीड इंटरनेट प्रकल्पाद्वारे रेल्वे व बस आरक्षण दूरध्वनीवर करणे, विजेचे देयक, महानगरपालिकेची विविध देयके प्रदान करणे, जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्रांचे वितरण नागरिकांसाठी सुलभ करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आजघडीला या ई–गव्हर्नन्स कार्यक्रमांचे यश अपयश मोजण्यासाठी प्रस्तुत संशोधन करण्यात आले आहे. तसेच ई–गव्हर्नन्स या संकल्पनेमुळे प्रशासकिय क्षेत्रात अनेक महत्वपुर्ण बदल घडून आले. व हे बदल जाणून घेण्याचा प्रयत्न या शोध निबंधामार्फत करण्यात आला आहे.

**शोध निबंधांची उद्दिश्टे :**

1. महाराष्ट्रामध्ये ई–गव्हर्नन्स ही संकल्पना किती यशस्वीपणे राबविली जात आहे याचा शोध घेणे. 2. या संकल्पनेमुळे महाराष्ट्रातील प्रशासनात किती सुधारणा घडून आली, व कोणकोणते बदल घडून आले याचे अध्ययन करणे. 3. ई–गव्हर्नन्समुळे महाराष्ट्रातील प्रशासनाला व जनतेला काय फायदा झाला हे जाणून घेणे. 4. ई–गव्हर्नन्स ही संकल्पना अंमलात आणतांना कोणकोणते अडथळे निर्माण होतात याचा शोध घेणे.

**संशोधन आराखडा :** या शोध निबंधासाठी अन्वेषनात्मक व निदानात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग केला आहे. कारण शोध निबंधाचा मुळ उद्देश हा ई–गव्हर्नन्सचे प्रशासनातील यश अपयश जाणून घेणे हा होता. या दोन्ही आराखडया मार्फत विषयानुरुप नियोजन व कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आला.

**तथ्य संकलनाचे स्त्रोत :** संबंधीत विषयासंदर्भात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्हीही तंत्रांचा अवलंब करण्यात आला. ज्या ज्या प्रशासकिय विभागामध्ये ई–गव्हर्नन्सच्या योजना राबविल्या जात आहेत, तेथे संपर्क साधुन, त्या संदर्भात माहिती संकलीत करण्यात आली. त्याच प्रमाणे कांही शोध निबंध व मासिकांचाही उपयोग यासाठी करण्यात आला आहे.

**<u>संशोधन क्षेत्र :</u>** संशोधनाचे क्षेत्र हे महाराष्ट्र राज्यातील राबविल्या जाणाऱ्या विविध ई–गव्हर्नन्स योजना आहेत. त्यांचा थोडक्यात तपशील खालील प्रमाणे घेता येईल.

❖महाराष्ट्रातील अन्न व नागरी पुरवठा विभागाने ग्रामीण भागातील जनतेला जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा स्वस्त दरात व वेळेत पोहंचविण्यासाठी वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण केले. संगणकीय कार्ड पध्दत अस्तीत्वात आणली ज्यामुळे शिधापत्रक वाटपासंदर्भातील गैर व्यवहाराला आळा बसला आहे. ❖महाराष्ट्र शासनाने शासकिय निवृत्तीवेतन धारकांच्या सुविधेसाठी **निवृत्त वेतन वाहिनी'** हे संकेतस्थळ सुरु केले. ज्यावर निवृत्तीवेतन संदर्भात अद्यावत तपशील, निवृत्तीवेतन धारकांची नवी व जुनी यादी, निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीचे अर्ज इत्यादी संदर्भात

माहिती उपलब्ध होणार आहे. ज्यामुळे लाभ घेणाऱ्यांचा वेळ व श्रम वाचणार आहे. ❖कल्याण डोंबीवली महानगर पालिकेने **'नागरीक सहाय्य केंद्र'** या द्वारे नागरीकांना विविध प्रकारचे दाखले देणे, कर गोळा करणे अशा योजना संगणक व ई–प्रशासनाच्या सहाय्याने प्रभाविपणे यशस्वी करून दाखविल्या आहेत. राज्यातील 240 नगर पालिकांमध्ये अशीच योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ❖ महाराष्ट्र राज्यातील रजिस्ट्रेशन व स्टॅम्पींग विभागामध्ये **'सरिता'** नावाचा संगणकीकृत प्रकल्प राबविला आहे. हा विभाग पुर्वी अकार्यक्षमतेच्या मुद्यामुळे वादग्रस्त होता, परंतु या प्रकल्पाच्या अंमलबजावणी नंतर विभागाच्या कार्यक्षमतेत सुधारणा घडून येत आहे. ❖ आदिवासी जनतेला तसेच सुशिक्षीत बेरोजगारांना महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना, रोजगार संदर्भातील योजना एक छत्राखाली उपलब्ध व्हाव्यात म्हणून एकात्मिक आदिवासी प्रकल्प, आदिवासी आयुक्तालय, नाशिक व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील पहिले माहिती सुविधा केंद्र आदिवासी भवन, नाशिक येथे सुरू करण्यात आले, यामुळे आदिवासी तरूणांचा वेळ, श्रम व पैसा यांची बचत होणार आहे. ❖महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाने बेरोजगारांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या उपलब्ध संधी व योजना या विषयी माहिती देण्याच्या उद्देशाने **'रोजगार वाहिनी'** (User Friendly) या संकेतस्थळाची निर्मिती केली. जलद व कार्यक्षम सेवा देऊन रोजगार व स्वयंरोजगार विषय प्रशिक्षण व करिअर विषयी अद्यावत माहिती देणे, ऑनलाईन सेवा उपलब्ध करून वेळेचा अपव्यय टाळणे इत्यादी या संकेतस्थळाचे उद्दिष्टये आहेत. ❖नाशिकचे विद्यमान जिल्हाधिकारी एस चोक्कलिंगम यांनी यापुर्वी वर्धा जिल्हयाच्या जिल्हाधिकारी पदाची जबाबदारी पार पाडतांना ई–गव्हर्नन्सचा प्रयोग प्रशासनात केला. त्यांनी लोकप्रतिनिधीच्या निधीतून विविध प्रकल्प कार्यान्वित केले आणि त्याद्वारे महसूल विभागाशी संबंधीत कार्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे विविध कर, दुरध्वनी देयकाचा शिकाऊ वाहन चालक परवाना आदि सुविधा नागरीकांना एका छताखाली संगणकाच्या माध्यमातून मिळण्याची व्यवस्था केली. ❖ ई–गव्हर्नन्स च्या माध्यमातून महाराष्ट्राला प्रगतीशिल राज्य बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नुकताच एक मुख्य सेवा करार केला. आणि या दिशेने पहिले पाऊल टाकले ते ई–सेवा केंद्राच्या द्वारे ई–गव्हर्नन्सच्या माध्यमातून शासकिय सेवा जलगतीने देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले व **'महा–ई–सेवा केंद्र'** ची स्थापना केली. दर चार गावांपाठीमागे एक या प्रमाणात ही सेवा केंद्र उभारण्यात येणार आहेत. जनतेने शासन दरबारी येण्याऐवजी शासनाने जनतेच्या दारी जावुन आवश्यक ती माहिती पुरवावी, हा या **'महा–ई–सेवा केंद्र'** च्या स्थापनेमागचा उद्देश आहे. या केंद्रामुळे सद्याची **'इन लाईन'** सेवा **'ऑन लाईन'** मिळू शकेल व जनतेला वेगवान पारदर्शी सेवा देणे शक्य होणार आहे.

**निष्कर्ष :** ❖ महाराष्ट्रातील अनेक शासकिय विभाग हे पुर्वी भ्रष्टाचार, दिरंगाई यासाठी कुप्रसिध्द होते. ते आज कार्यक्षमपणे कार्य करीत आहेत. विभागातील भ्रष्टाचार कमी होऊन कार्यक्षमतेत वाढ झाल्याचे चित्र निदर्शनास येत आहे. ज्याचे श्रेय ई–गव्हर्नन्सच्या विविध कार्यक्रमांना दिले जाते. ❖महाराष्ट्रातील शासन व प्रशासन तळागाळातील ग्रामीण भागापर्यंत पोंहचत आहे, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या समस्या जाणून घेवुन प्रभावी अशा उपाययोजना अंमलात आणत आहेत, जे की ई–गव्हर्नन्सच्या तांत्रिक घटकांमुळे शक्य झाले आहे. ❖ पुर्वी ग्रामीण भाग जो की विकासाच्या प्रवाहापासून दूर होता, तो आज या प्रवाहात सामील होतांना दिसुन येत आहे. ❖ महाराष्ट्रातील ईगव्हर्नन्सच्या योजनांची सुरूवात सन 2000 पासून झाली. या आठ वर्षाच्या काळात ई–गव्हर्नन्सच्या योजना यशस्वीपणे प्रशासकिय सुधारणेचे कार्य करीत आहे. परंतू तरी देखील त्यांच्यावर अधिक पैसा खर्च करण्याची आवश्यकता आहे. ❖ महाराष्ट्रातील नागरीक मग तो शहरी असो, ग्रामीण असो अथवा आदिवासी प्रत्येक व्यक्तीला या ई–गव्हर्नन्समुळे फायदा होत आहे. शासनामार्फत तयार होणाऱ्या योजना, कार्यक्रम त्यांच्या पर्यंत प्रभावीपणे पोंहचत आहेत. ❖ महाराष्ट्रातील ग्रामीण जनता व ई–गव्हर्नन्स राबविणारा कर्मचारी वर्ग यांचे संगणकासंदर्भातील अद्यावत ज्ञान या संकल्पनेच्या यशस्वीतेमधील मुख्य अडथळा आहे. या दोन्ही घटकांना प्रशिक्षण देवुन हा अडथळा दुर करता येतो. ❖ महाराष्ट्र शासनामार्फत ई–गव्हर्नन्सवरील केला जाणारा खर्च जरी दरवर्षी 23% वाढत असला तरी एकदरीत हा खर्च कमी आहे. त्याचप्रमाणे उपयोगात आणली जाणारी संकेतस्थळे कमी आहेत. या बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे. खर्चात व संकेतस्थळामध्ये वाढ करून ही समस्या देखील दुर करता येते. ❖ भाषा ही महत्वाची समस्या या संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीत अडथळा निर्माण करीत आहे. शासनामार्फत तयार केल्या जाणाऱ्या संकेतस्थळांची भाषा इंग्रजी आहे. जी की, ग्रामीण भागातील लोकांना अवगत नाही. त्यामुळे ही भाषा मराठी करावी.

## संदर्भ ग्रंथ

1) सिव्हील सर्व्हीस न्युज–एप्रिल 2008 2) लोकराज्य–प्रकाशक माहिती व प्रसारण मंत्रालय,मुंबई डिसेंबर 2007 3) योजना – प्रकाशक माहिती व प्रसारण मंत्रालय, मुंबई डिसेंबर 2008, 4) प्रा.बाजीराव वडवळे, प्रा.डॉ.भुताळे –लोकप्रशासन, सहयाद्री प्रकाशन, नांदेड. 5) बी.एल.फाडीया–उच्चतर लोकप्रशासन, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा. 6) कर्मचारी, तक्रार निवारण व पेन्षन मंत्रालय– वार्षिक अहवाल 2004–05, भारत सरकार दिल्ली.